नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - ८५ Issue - 85 | वार - बुधवार दि. १९ ऑगस्ट २०२६ Blow- Wednesday Date 19 AUGUST 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# राज्यातील २.०७ कोटी मतदार ‘एसआयआर’ प्रक्रियेबाहेर

## एकूण ७.७१ कोटी अर्ज जमा; १७.६३ लाख दुबार मतदारांची नोंद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील मतदारयाद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) मोहीम १७ ऑगस्ट रोजी संपली असली, तरी तब्बल २.०७ कोटी मतदार या प्रक्रियेबाहेर राहिल्याची माहिती समोर आली आहे. या मोहिमेअंतर्गत ७ कोटी ७१ लाख मतदारांनी आपले अर्ज निवडणूक आयोगाकडे सादर केले. ही संख्या एकूण ९.७८ कोटी नोंदणीकृत मतदारांच्या ७८.८५ टक्के इतकी आहे. तर, उरलेल्या २ कोटी ७ लाख मतदारांचे म्हणजेच २१.१५ टक्के अर्ज ‘अगोचर’ श्रेणीत वर्ग करण्यात आल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली.



राज्यात ३० जून ते १७ ऑगस्ट दरम्यान ही मोहीम राबविण्यात आली. यादरम्यान ज्या मतदारांचे अर्ज गोळा होऊ शकले नाहीत किंवा जे निकषांनुसार अपात्र ठरले, त्यांच्या श्रेणीनिहाय आकडेवारीनुसार ७५.५२ लाख मतदार अनुपस्थित किंवा घरी सापडले नाहीत, ७६.८० लाख मतदार कायमस्वरूपी स्थलांतरित झाले आहेत, ३४.८१ लाख मतदारांचे निधन झाले आहे, तर १७.६३ लाख मतदार इतरत्र आधीच नोंदणीकृत किंवा दुबार असल्याचे आढळले आहे. याशिवाय २.२३ लाख इतर प्रकरणांत अर्ज सादर झालेले नाहीत.

या अर्जांची तात्पुरती यादी जिल्हाधिकाऱ्यांच्या संकेतस्थळांवर काही दिवसांपूर्वीच प्रसिद्ध करण्यात आली आहे. राजकीय पक्षांच्या बुथ लेव्हल एजंट्समार्फत याद्यांमधील नावांसंदर्भात माहिती उपलब्ध करून देण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्यानुसार संबंधित बुथ लेव्हल अधिकाऱ्यांमार्फत पडताळणी करून पात्र मतदारांचे अर्ज गोळा करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. आता या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत तयार करण्यात आलेल्या मतदारयाद्यांचे प्रारूप लवकरच प्रसिद्ध केले जाणार आहेत. या प्रारूप याद्यांच्या छापील व सॉफ्ट प्रती सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना उपलब्ध करून दिल्या जातील. तसेच ज्या नावांचा समावेश प्रारूप यादीत होऊ शकलेला नाही, अशा ‘अगोचर’ श्रेणीतील मतदारांची यादी संबंधित शासकीय कार्यालयांच्या नोटीस बोर्डावर आणि जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या संकेतस्थळावर दिली जाईल.

### हरकत घेण्यासाठी १ महिन्याची मुदत

प्रारूप मतदारयादी जाहीर झाल्यानंतर ती नागरिकांच्या तपासणीसाठी खुली राहणार असून, त्यानंतर दावे आणि हरकती दाखल करण्यासाठी एक महिन्याचा अवधी दिला जाणार आहे. या कालावधीत ज्या मतदारांची नावे प्रारूप यादीत आलेली नाहीत किंवा १ ऑक्टोबर रोजी वयाची १८ वर्षे पूर्ण करणारे नवे तरुण मतदार विहित नमुन्यातील घोषणापत्र व कागदपत्रांसह नाव समाविष्ट करण्यासाठी अर्ज करू शकतात. निवडणूक नोंदणी अधिकाऱ्यांकडून पडताळणी झाल्यानंतर पात्र अर्जांचा अंतिम मतदारयादीत समावेश केला जाईल. याशिवाय दावे व हरकतींच्या काळात नावे समाविष्ट करणे, मतदारयादीतील नोंदी दुरुस्त करणे किंवा नाव वगळण्यासाठी हरकत नोंदवण्यासाठी विविध अर्ज दाखल करता येतील.

मतदारयादीत नाव समाविष्ट करणे, दुरुस्त करणे किंवा नाव वगळण्यासाठी अर्ज करताना कोणीही व्यक्ती खोटी घोषणा किंवा चुकीचे विधान करत असल्याचे आढळल्यास, त्यांच्यावर लोकप्रतिनिधी कायदा, १९५० च्या कलम ३१ नुसार कायदेशीर कारवाई केली जाईल. यामध्ये एका वर्षापर्यंतचा कारावास, दंड किंवा दोन्ही शिक्षांची तरतूद आहे, असा इशारा प्रशासनाने दिला आहे. ही संपूर्ण प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर येत्या २७ ऑक्टोबर रोजी अंतिम मतदारयादी प्रसिद्ध केली जाणार आहे.

# सरकारी रुग्णालयांमध्ये हलगर्जीपणा चालणार नाही! स्वच्छता, आहार आणि औषधांच्या दर्जावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचे कडक निर्देश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : शासकीय रुग्णालयांची विश्वासार्हता अधिक वाढविण्यासाठी या रुग्णालयांमधली स्वच्छता, रुग्णांना देण्यात येणारा आहार, तसेच औषधाचा दर्जा याबाबत काटेकोर राहण्याचे आणि कोणत्याही परिस्थितीत या तिन्ही मुद्द्यांवर तडजोड न करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आरोग्य विभागाला दिले. आज त्यांनी मंत्रालयात सार्वजनिक आरोग्य विभागाचा आढावा घेतला त्यावेळी ते बोलत होते. सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी यावेळी सादरीकरण केले. रुग्णालये, आणि आरोग्य केंद्रांची अपूर्ण बांधकामे तातडीने पूर्ण करावीत जेणे करून खेड्यापाड्यातल्या नागरिकांना सुद्धा अधिक दर्जेदार, सुलभ आणि वेळेवर आरोग्यसेवा मिळतील असेही उपमुख्यमंत्री म्हणाले. आरोग्यसेवेची गुणवत्ता वाढवताना नामांकित स्वयंसेवी संस्था आणि उद्योगांचे देखील सीएएसआरच्या माध्यमातून योगदान मिळवावे, प्राथमिक आरोग्य केंद्रांना त्याचा अधिकाधिक फायदा करून द्यावा असे सांगून मनुष्यबळ,



पायाभूत सुविधा, रुग्णांच्या सुविधा तसेच डिजिटल आरोग्य सेवांना अधिक गती देण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. शासकीय रुग्णालये आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये देण्यात येणाऱ्या औषधांचा दर्जा चांगलाच हवा. रुग्णांना महिला बचत गटामार्फत आहार देण्यात येतो या आहाराचा दर्जाही चांगलं असणे गरजेचे आहे. याशिवाय स्वच्छता ही तर सर्वात मोठी बाब आहे असे सांगून उपमुख्यमंत्री म्हणाले की, प्रशासनाने यावर अतिशय काटेकोरपणे लक्ष ठेवावे व प्रसंगी याचे पालन न करणाऱ्यांवर तातडीने कडक कारवाई करावी. प्रत्येक बाबतीत शहरांमधल्या रुग्णालयांवर खेड्यापाड्यातल्या रुग्णांना अवलंबून राहावे लागते. सदाह्य सध्या गोष्टींसाठी सुद्धा उपचाराकरिता गोरगरीबांना शहरात जावे लागणे बरोबर नाही हे सांगून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, विविध वैद्यकीय विशेषज्ञांच्या सेवा ग्रामीण रुग्णालयांमध्येही मिळाल्या पाहिजेत कामगार विमा योजनेचे जाळे मोठे आहे. त्यांच्याकडे रुग्णालये व मोठ्या प्रमाणावर साधनसंपत्ती आहे. मात्र या रुग्णालयांना अधिक बळकट करण्याची गरज आहे असे सांगून उपमुख्यमंत्र्यांनी यावर प्राधान्याने उपाययोजना करण्यास सांगितले. कामगार विमाच्या माध्यमातून अधिकाधिक आरोग्य सेवा कामगार तसेच सर्वसामान्यांना मिळाल्या पाहिजेत यावर भर द्यावा असेही ते म्हणाले. रुग्णालयातील सांडपाणी प्रक्रिया केंद्र हे जैव वैद्यकीय कचरा आणि दूषित पाण्यावर प्रक्रिया करून ते सुरक्षित बनवणारी यंत्रणा आहे. सीपीसीबी नियमांनुसार रुग्णालयांसाठी हे बंधनकारक आहे. हे दूषित पाणी आणि जंतू नष्ट करून पर्यावरणाचे रक्षण करते त्यामुळे प्रदूषण नियंत्रण मंडळासमवेत तत्काळ बोलणी करून अशा पद्धतीची केंद्रे रुग्णालय परिसरात सुरु करा असेही निर्देश त्यांनी दिले.

# कपिल सिब्बल यांचे दावे बिनबुडाचे, माझाच निर्णय खरा ठरणार, राहुल नार्वेकर यांचं प्रत्युत्तर!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : सर्वोच्च न्यायालयात सध्या शिवसेना पक्ष आणि चिन्हाच्या संदर्भात सुनावणी सुरु आहे. शिवसेना ठाकरे गटाच्या वतीने कपिल सिब्बल हे बाजू मांडत आहेत. आजच्या सुनावणीत कपिल सिब्बलांनी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांनी दिलेल्या निर्णयावरच आक्षेप नोंदवला आहे. राहुल नार्वेकरांनी अधिकारांची मर्यादा ओलांडली असल्याचं सिब्बल यांनी म्हटलं आहे. दरम्यान, त्यांच्या या वक्तव्यानंतर राहुल नार्वेकरांनीं देखील प्रत्युत्तर दिलं आहे. कपिल सिब्बलांनी केलेले दावे बिनबुडाचे असल्याची टीका नार्वेकरांनी केली. ते यवतमाळमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलत होते.



कपिल सिब्बल हे त्यांच्या पक्षकारासाठी युक्तिवाद करत आहे, ते काय म्हणतात याच्यातून काही सिद्ध होत नाही असे नार्वेकर म्हणाले. मी जी भूमिका घेतली आहे, मी जो निर्णय दिलेला आहे तो कायद्याच्या चौकटीत राहून दिलेला निर्णय आहे. सुप्रीम कोर्टाने जे निकष दिले, त्या निकषाच्या आत राहून, त्या आधारावरतीच हा निर्णय दिला दिल्याचे नार्वेकर म्हणाले. त्यांचे जे वकिल असतील त्यांच्या संदर्भात ते युक्तिवाद करतील, याचाच अर्थ असा नाही की ते जे म्हणताय ते सत्य आहे. अध्यक्षांनी काय ठरवलं हे त्यांना कसं समजलं पहिला प्रश्न हा आहे असे नार्वेकर म्हणाले. असे बिनबुडाचे आरोप करुन कोणताही फरक पडत नाही, मी दिलेला निर्णय हा अत्यंत शाश्वत निर्णय असल्याचे नार्वेकर म्हणाले. या निर्णयामध्ये कोणताही बदल होईल असं मला वाटत नाही असेही ते म्हणाले.

# देशातील दोन कोटींपेक्षा जास्त विद्यार्थ्यांचे बायोमेट्रिक अपडेट पूर्ण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारतीय विशिष्ट आळख प्राधिकरण (यूआयडीएआय) तर्फे देशभरात युद्ध पातळीवर राबवण्यात येत असलेल्या अनिवार्य बायोमेट्रिक अद्यतन (एमबीयू) मोहिमेने महत्त्वपूर्ण टप्पा गाठला असून देशभरातील शालेय विद्यार्थ्यांपैकी २० दशलक्षांहून अधिक (२ कोटींहून अधिक) विद्यार्थ्यांची अनिवार्य बायोमेट्रिक अद्यतने पूर्ण करण्यात यश मिळाले आहे. शालेय विद्यार्थ्यांच्या एमबीयू स्थितीबाबत दृश्यमानता देऊ करणाऱ्या शिक्षणासाठीच्या एकीकृत जिल्हा माहिती यंत्रणा प्लस (यूडीआयएसई+) सह यूआयडीएआयचे तांत्रिक एकत्रीकरण करून हा उपक्रम राबवण्यात येत आहे.

सप्टेंबर २०२५ मध्ये सुरु करण्यात आलेल्या विशेष अभियानाचा विस्तार आतापर्यंत १.५६ लाख शाळांपर्यंत झाला असून या अभियानाच्या मदतीने, समर्पित शाळा-स्तरीय शिबिरे तसेच यूआयडीएआय आणि राज्ये/केंद्रशासित प्रदेशांच्या शिक्षण विभागांतर्फे राबवण्यात येणारे समन्वित संपर्क कार्यक्रम यांच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांना त्यांचे आधार बायोमेट्रिक अद्ययावतीकरण करणे सोयीस्कररित्या शक्य झाले आहे. या उपक्रमामुळे एमबीयूसंबंधी सेवा विद्यार्थ्यांना थेट त्यांच्या शाळेत उपलब्ध होण्यात मदत झाली असून सदर प्रक्रिया कोट्यवधी विद्यार्थ्यांसाठी अधिक सुलभतेने आणि सोयीस्कर पद्धतीने उपलब्ध झाली आहे.




पाच वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांसाठीच्या आधार नोंदणीद्वारे लोकसंख्याविषयक माहिती आणि छायाचित्र जमा केले जाते तर या वयात बोटांचे ठसे आणि डोळ्यांचे बायोमेट्रिक्स अजूनही विकास पावत असल्यामुळे या मुलांच्या दोन्ही बायोमेट्रिक घटकांची नोंद केली जात नाही. लहान मुलांच्या आधारमध्ये अद्ययावत बायोमेट्रिक माहिती जमा केली जाईल याची सुनिश्चिती करून घेण्यासाठी एमबीयु सहाय्यक ठरते. बालकाच्या वयाची ५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर आणि पुन्हा त्याच्या वयाची १५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर अशा दोन टप्प्यांवर एमबीयु आवशयक असते. एमबीयुची योग्य वेळी पूर्तता झाल्यामुळे विद्यार्थ्याला शाळा आणि उच्च शिक्षणाचे टप्पे पार करत आधार प्रमाणीकरण अनिवार्य असलेल्या विविध सेवा आणि लाभ मिळवताना आवश्यक असलेली आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया सुरळीतपणे पार पडण्याची सुनिश्चिती होण्यात मदत होते.

सदर प्रक्रियेची वेळेवर पूर्तता करण्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या आणि संबंधित सेवा आधील सुलभतेने उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने युआयडीएआयने ७ ते १५ वर्षे वयोगटातील मुलांना एमबीयूसाठी भरावे लागणारे शुल्क १ ऑक्टोबर २०२५ पासून एक वर्षाच्या कालावधीसाठी रद्द केले होते. वय वर्षे ५ ते ७ आणि १५ ते १७ या गटांतील मुलांसाठी पूर्वीप्रमाणेच यापुढेही एमबीयू सेवा निःशुल्क असणार आहे. त्यामुळे तांत्रिकदृष्ट्या ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत ५ ते १७ वर्षे या वयोगटासाठी एमबीयू मोफत असणार आहे.

आधारचे एमबीयू करून घेतले नाही तर विविध सरकारी योजनांचा लाभ घेताना, नीट, जेईई, सीईआयटी इत्यादींसारख्या अनेक स्पर्धा तसेच विद्यापीठ परीक्षांसाठी नावनोंदणी करताना आवश्यक असलेल्या प्रमाणीकरणाच्या वेळी अडचणी उद्भवू शकतात. पालकांनी तसेच कायदेशीर संरक्षकांनी त्यांच्या मुलांसाठी आधारमध्ये एमबीयूची पूर्तता करून घ्यावी असे आवाहन यूआयडीएआयने केले आहे.

**महायुती सरकारची लाडक्या बहिणींना विशेष भेट**

**१० वर्षांपर्यंत कारावास, ७ लाखांचा दंड, धर्मांतराच्या उद्देशाने केलेले विवाह अवैध**

# रक्षाबंधनापासून ‘महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य’ कायद्याची अंमलबजावणी होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : गेल्या काही वर्षांत वाढीस लागलेल्या धर्मांतराच्या प्रवृत्तीला पायबंद घालण्यासाठी राज्य शासनाने अर्थसंकल्पीय अधिवेशनात मंजूर केलेल्या 'महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक, २०२६'चे कायद्यात रूपांतर झाले आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी ३० जुलै २०२६ रोजी या विधेयकावर स्वाक्षरी केल्यानंतर, येत्या २८ ऑगस्ट रोजी रक्षाबंधनाच्या मुहूर्तावर या नव्या कायद्याची राज्यभरात अंमलबजावणी सुरू होणार आहे.

भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला धर्मस्वातंत्र्याचा अधिकार दिला असला, तरी तो सार्वजनिक सुव्यवस्था, नैतिकता आणि आरोग्याच्या अधीन राहूनच अमलात येतो. मात्र, अलिकडच्या काळात भोळ्याभाबड्या नागरिकांना नोकरीचे आमिष, मोफत शिक्षण, विवाहाचे खोटे वचन किंवा 'दैवी चमत्कारांचा' बनाव रचून बळजबरीने किंवा प्रलोभन दाखवून धर्मांतरित करण्याचे प्रकार वाढले आहेत. त्यामुळे अशा गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी शासनाने हे पाऊल उचलले आहे. नव्या कायद्यानुसार, बळजबरीने किंवा आमिष दाखवून धर्मांतर करणाऱ्या दोषींना १० वर्षांपर्यंतचा कठोर कारावास आणि ७ लाख रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद करण्यात आली आहे.

या नव्या कायद्यातील सर्वात लक्षवेधी तरतूद म्हणजे, धर्मांतराच्या उद्देशाने केलेले विवाह न्यायालयाकडून 'शून्यवत' म्हणजेच पूर्णपणे अवैध ठरवले जाणार आहेत. मात्र, अशा विवादास्पद विवाहातून जन्माला आलेल्या निष्पाप बालकांच्या हक्कांचे व भविष्याचे पूर्ण संरक्षण या कायद्यात करण्यात आले आहे. अशा बालकांना आई-वडिलांच्या संपत्तीत पूर्ण कायदेशीर अधिकार मिळणार असून, त्यांच्या अभिरक्षेचा (कस्टडी) अधिकार कायमस्वरूपी आईकडेच राहील, अशी तरतूद शासनाने केली आहे.

या कायद्यानुसार, कलम ३ चे उल्लंघन करून केल्या जाणाऱ्या गुन्ह्यासाठी ७ वर्षांपर्यंत कारावास आणि १ लाख रुपये दंडाची शिक्षा आहे. जर पीडित व्यक्ती अल्पवयीन किंवा अनुसूचित जाती-जमातीची असेल, तर शिक्षेची व्याप्ती वाढवून ७ वर्षे कारावास आणि ५ लाख रुपये दंड आकारला जाईल. हा गुन्हा पुन्हा-पुन्हा करणाऱ्यांना १० वर्षांची कोठडी आणि ७ लाख रुपये दंडाची तरतूद करण्यात आली आहे.

### विवाहाआधी ६० दिवसांची नोटीस बंधनकारक



स्वेच्छेने धर्म बदलू इच्छिणाऱ्या व्यक्तीला जिल्हा दंडाधिकाऱ्यांकडे किमान ६० दिवस आधी पूर्वसूचना द्यावी लागेल. या नोटिशीवर ३ दिवसांच्या आत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या फलकावर आक्षेप मागवले जातील आणि काही हरकत आल्यास पोलीस चौकशी करतील. धर्मांतरानंतर २१ दिवसांच्या आत घोषणापत्र सादर करणे बंधनकारक असेल. - रोख रक्कमच नव्हे, तर विनामूल्य शिक्षण, चांगल्या जीवनशैलीचे प्रलोभन, भेटवस्तू किंवा अन्य धर्मांचा अपमान करून स्वतःच्या धर्माचा मोठेपणा सांगणे यालाही 'आमिष' मानले जाईल. तसेच 'दैवी प्रकोप' होईल अशी भीती दाखवणे, सामाजिक बहिष्काराची धमकी देणे किंवा मानसिक दबाव आणणे या गोष्टी 'बळजोरी'च्या कक्षेत येतील. - या कायद्यांतर्गत येणारे सर्व गुन्हे दखलपात्र आणि अजामीनपात्र असतील. पीडित व्यक्तीसह तिचे रक्ताचे नातेवाईक तक्रार दाखल करू शकतील, शिवाय पोलिसांनी स्वतःहून (सुमोटो) कारवाई करण्याचे अधिकारही असतील. तसेच एखादी संस्था (एनजीओ, रुग्णालय, शाळा) यात दोषी आढळल्यास तिची नोंदणी तत्काळ रद्द करून सरकारी अनुदान कायमचे बंद केले जाईल. - विशेष म्हणजे 'धर्मांतर बळजबरीने किंवा फसवणुकीने झालेले नाही' हे सिद्ध करण्याची कायदेशीर जबाबदारी संबंधित आरोपीवर किंवा त्या कृत्यात मदत करणाऱ्या व्यक्तीवरच असेल.

### तपासाचे अधिकारही निश्चित

या प्रकरणांचा तपास पोलीस उपनिरीक्षक (पीएसआय) दर्जापेक्षा कमी असलेल्या अधिकाऱ्याला करता येणार नाही, तर या प्रकरणांची सुनावणी सत्र न्यायालयात चालवली जाईल. त्यामुळे खटले जलद गतीने निकाली निघतील. दरम्यान, हा कायदा कोणाही एका विशिष्ट धर्माच्या विरोधात नसून, मानवी हक्कांचे शोषण रोखण्यासाठी आणि राज्याची शांतता व सलोखा टिकवण्यासाठी असल्याचे उद्देशिकेत स्पष्ट करण्यात आले आहे. यापूर्वी ओडिसा, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, गुजरात, हिमाचल प्रदेश आणि कर्नाटकसह देशातील काही निवडक राज्यांत अशा प्रकारचे कायदे अस्तित्वात असून, आता या मालिकेत महाराष्ट्राचाही समावेश झाला आहे.

## संपादकीय....

### राज्याचा वाटा

गुंतवणूक, तंत्रज्ञान आणि अर्थव्यवस्थेच्या विकासामध्ये भारत आणि जगाची जोडणी करण्यासाठी महाराष्ट्र हे प्रवेशद्वार आहे. भविष्यातील विविध क्षेत्रातील गरजा लक्षात घेता महाराष्ट्रामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता संशोधन आणि विकास, डेटा सेंटर, ग्लोबल कॅम्बिलिटी सेंटर यासोबत पायाभूत सुविधांची परिसंस्था निर्माण करण्यात येत आहे. त्यामुळे समृद्ध भारताच्या निर्मितीसाठी गुंतवणूकदारांचे महाराष्ट्र हे यशस्वी डेस्टिनेशन झाले आहे. राज्यातील विविध क्षेत्रातील संधीचा लाभ घेत अमेरिकेतील गुंतवणूकदारांनी आपल्या कल्पना, संशोधन घेऊन महाराष्ट्रात यावे. महाराष्ट्र शासन त्यांना येथील कौशल्य, बाजारपेठ, पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देईल. त्यामुळे त्यांनी राज्यात गुंतवणूक करावी असे आवाहन नुकतेच मुख्यमंत्र्यांनी केले. सध्या अमेरिका आणि भारतातील भागीदारी ही २१ व्या शतकातील अत्यंत महत्वपूर्ण भागीदारीपैकी एक आहे. या भागीदारीचा पुढील टप्पा हा धोरणात्मक आणि अर्थव्यवस्थेमध्ये सहभाग वाढविण्याचा आहे. या टप्प्यामध्ये महाराष्ट्र हा केंद्रस्थानी असणार आहे. हे दशक भारत आणि अमेरिकेच्या धोरणात्मक भागीदारीचे आहे. अमेरिकन चेंबर्स ऑफ कॉमर्सने या परिषदेसाठी 'भारत-अमेरिका सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारीची पुनर्रचना' हा अत्यंत महत्वाचा विषय घेतला आहे. ही परिषद भारत आणि अमेरिकेतील गुंतवणूक, संशोधन, निर्माण आणि विकास यामध्ये सहकार्य वाढवण्यासाठी महत्त्वाची ठरणार आहे. महाराष्ट्र ही ६६० बिलियन डॉलर अर्थव्यवस्था असून मागील सात वर्षांपासून १०.२ टक्के दराने विकास करीत आहे. राज्यात एकूण लोकसंख्येच्या ६५ टक्के लोकसंख्या ही २७ वर्ष वयापर्यंत आहे. जगाच्या दृष्टीने विचार केला, तर महाराष्ट्र ही जगातील पहिल्या २० देशांमधील अर्थव्यवस्था आहे. भारत हा जगामध्ये सर्वात तरुण देश आहे आणि या तरुण देशांमध्ये महाराष्ट्र हे तरुणाईचे आकर्षण आहे. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था ही वैविध्यपूर्ण आहे. उत्पादन क्षेत्रापासून ते मनोरंजन क्षेत्रापर्यंत सर्व क्षेत्रांचा वाढता राज्याच्या सहभाग अर्थव्यवस्थेमध्ये आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, बदलत जाणारे तंत्रज्ञान हे भारत आणि अमेरिकेतील भागीदारीला बदलाचे स्वरूप देत आहे. अमेरिकेमध्ये नवनवीन संशोधन, तंत्रज्ञानाचा विकास आणि जागतिक उद्योगांच्या विकासामध्ये अग्रेसर होण्याची क्षमता आहे. त्यामुळे महाराष्ट्र आणि अमेरिका जागतिक क्षमता केंद्र विकसित करणे, नवीन डाटा सेंटर निर्माण करणे यामध्ये सहकार्यातून भरारी घेऊ शकतात. तसेच नवीन जागतिक पुरवठा साखळी मजबूत करण्यावरही भर देऊ शकतात. वैद्यकीय क्षेत्रातील जागतिक क्षमता भारतामध्ये अधिक मजबुतीने पुढे आली आहे. यामध्ये महाराष्ट्राचा वाटा मोठा आहे. आरोग्य क्षेत्रामध्ये भारत हे स्केल इंजिन तर अमेरिका इनोव्हेशन इंजिन आहे. या दोन्हींच्या एकत्रीकरणातून आरोग्य क्षेत्रामध्ये मोठी झेप महाराष्ट्राच्या मदतीने घेतली जाऊ शकते. महाराष्ट्र हे १६५ एकर क्षेत्रावर नवी मुंबई परिसरात मेडिसिटी विकसित करीत आहे. जागतिक दर्जाची अद्ययावत रुग्णालय या ठिकाणी उभारण्यात येत आहे. यासोबतच डिजिटल पायाभूत सुविधांच्या निर्मितीमध्ये मुंबई आणि नवी मुंबई परिसर विकसित होत आहे.

# अधिकमासामुळे यंदा गणपती बाप्पाचे उशिरा आगमन

## १४ सप्टेंबर पासून गणेशोत्सव; बँड पथक, सजावटीसाठी मंडळांची चळवळ सुरू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
निफाड/प्रतिनिधी

हिंदू धर्मात प्रत्येक महिन्याचे विशेष महत्त्व आहे ,श्रावण या पवित्र महिन्यानंतर भाद्रपद महिन्यात चौथ्या दिवसापासून गणपती उत्सवाला प्रारंभ होतो, एका महिन्यावर येऊन ठेपलेल्या गणपती उत्सवाची मात्र आत्तापासूनच लगबग सुरू असून मागील वर्षीच्या तुलनेत यावर्षी अधिकमास महिना वाढल्यामुळे यंदा १९ दिवस उशिरा गणपती बाप्पाचे आगमन होणार असले तरी गणपती मंडळे बँडपथक , ढोल ताशे बुकिंग, सजावटीसाठी सरसावले असून मूर्तिकारही बाप्पांच्या मूर्तीवर अखेरचा हात फिरवत आहे.

गणेश चतुर्थी हा सण दरवर्षी भाद्रपद महिन्यातील शुक्ल पक्षाच्या चतुर्थी तिथीला साजरा केला जातो.त्यानुसार गणपती उत्सवाला १४ सप्टेंबर (सोमवार) पासून सुरुवात होणार असली तरी गणरायाचा मुक्काम राहणार असून मागील वर्षीच्या तुलनेत यावर्षी बाप्पाचे १९ दिवस उशिरा आगमन होणार असले तरी आतापासूनच मूर्तिकार ,गणपती मंडळे तयारीला लागले असून मूर्तींची बुकिंग होऊन पोहोच केली जात आहे.बाहेरील राज्यातील मूर्तिकार मूर्ती बनविण्यासाठी महाराष्ट्रात आल्याने स्थानिक कारागिरांना त्याचा फटका बसत आहे.

**मूर्ती बनविण्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाचे भाव युद्धामुळे वाढल्याने अर्थात मूर्ती बनविण्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाच्या खर्चात वाढ झाल्याने मूर्ती विक्री मध्ये ही वाढ झाली आहे .कलर सहित कच्च्या मालाचे भाव वाढल्याने मूर्तीमध्येही भाव वाढ करावी लागत आहे.संपूर्ण नाशिक संभाजी नगर या भागातील मूर्तीची बुकिंग पोहोच केली जात असून काही मूर्तीवर अखेरचा हात फिरवला जात आहे.**
**– दत्तू क्षीरसागर (मूर्तिकार, निफाड)**



अवघ्या एक महिन्यावर येऊन ठेपलेल्या गणेश उत्सवाला लागणाऱ्या गणपती बाप्पांच्या मूर्ती कामात व्यस्त असलेले निफाड येथील मूर्तिकार दत्तू क्षीरसागर

### १९ दिवस उशिरा आगमन, १२ दिवस मुक्काम

गेल्या वर्षाच्या तुलनेत यावर्षी गणपती बाप्पा १९ दिवस उशिरा विराजमान होतील. या दिवशी गणेशाची पूजा केली जाईल; तर गौरी-गणपती विसर्जन हे १९ सप्टेंबर २०२६ रोजी होणार. तर गणपती विसर्जन (अनंत चतुर्दशी) २५ सप्टेंबर २०२६ रोजी होणार आहे. म्हणजेच १४ सप्टेंबर ते २५ सप्टेंबर २०२६ दरम्यान गणेशोत्सव साजरा केला जाणार आहे. त्यानंतर १२ व्या दिवशी गणपती बाप्पाचे विसर्जन होणार आहे यावर्षी बाप्पांची मूर्ती बनविण्याची लगबग अखेरच्या टप्प्यात असून त्यामुळे मूर्ती कारागिरांनाही अधिक वेळ मिळाला आहे ,मागील वर्षी २७ ऑगस्टला गणेश उत्सवाला सुरुवात झाली होती यावर्षी मात्र बारा दिवस

**गणेश चतुर्थी महत्त्व...**

गणेश चतुर्थी हा गणपतीचा जन्म दिवस म्हणून साजरा केला जातो. गणेश चतुर्थीच्या दिवशी श्रीगणेशाची पूजा केल्याने भक्ताला बुद्धी, समृद्धी व सौभाग्य प्राप्त होते, असे मानले जाते. गणेश चतुर्थीच्या दिवसापासून गणेशोत्सव सुरू होतो. हा उत्सव १०,१२ दिवस चालतो. या उत्सवात गणेशाची विधिवत पूजा केल्यास शुभफल प्राप्त होते.

**देशभर गणेश उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो, पण महाराष्ट्रात गणेशोत्सवाचा एक वेगळाच उत्साह पाहायला मिळतो. यात काही दिवसातच गणेश मंडळात सजावटीचे लगबग सुरु होणार आहे, गणेशभक्त ११,१२ दिवस गणपती बाप्पाची आरती, भजन, कीर्तनात दंगून जाण्यास सज्ज झाले आहेत. गणेशाची भक्तीभावाने पूजा करण्यास उत्सुक आहेत.**
**–राहुल कुलकर्णी (पुरोहित, निफाड)**

# पंढरपूर शहर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेची धडाकेबाज कामगिरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
प्रतिनिधी/पंढरपूर

पंढरपूर शहर पोलीस ठाणे हद्दीतील श्री विठ्ठल नाचे दर्शनाकरिता आलेल्या भाविकांची गर्दीमध्ये मोबाईल फोडून घाल झालेली तसेच चोरीस एकूण १०,३५०००/रुपये किमतीचे गेलेले ४६ मोबाईल यांचा उएखठ टोटल द्वारे तसेच गोपनीय बातमीदार मार्फत शोध घेऊन ते प्रेस करण्यात आले आहेत.

सदरचे मोबाईल हे मा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी मा अप्पर पोलीस अधीक्षक श्री विजय कबाडे मा श्री प्रशांत डगळे सह पोलीस अधीक्षक उपगीय पोलीस अधिकारी पंढरपूर विभाग पंढरपूर यांच्या सूचनेनुसार पंढरपूर शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री महेश ढवण यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी केले आहे.

सदरची कामगिरी ही मा पोलीस अधीक्षक श्री अतुल कुलकर्णी, मा अप्पर पोलीस अधीक्षक श्री डॉक्टर विजय कबाडे मा सह पोलिस अधीक्षक श्री प्रशांत डगळे उपविभागीय पोलीस अधिकारी पंढरपूर विभाग पंढरपूर तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री महेश ढवण पंढरपूर शहर पोलीस ठाणे तसेच गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस उपनिरीक्षक श्री नितीन जगताप साहेब पोलीस सुजित उबाळे पोलीस हेडकॉन्स्टेबल २४७ बनसोडे, पंधराशे त्र्याऐंशी मोरे पोलीस हेड कॉन्स्टेबल ८०५ पवार



पोहे का १७८९ हेंबाडे पोलीस कॉन्स्टेबल १४१३ काजी ३१ माने धोका बाराशे १६ म्हणले पोलीस कॉन्स्टेबल बाराशे ४० ठक्करउएखठ पोर्टलचे काम पाहणारी पोलीस कॉन्स्टेबल पोलीस हेड कॉन्स्टेबल आवटी २२१, सायबर पोलीस ठाण्याकडील पोलीस कॉन्स्टेबल गोविंद सोनवणे यांनी केली आहे.

## माळशिरस तालुक्याचे सभापती दत्ता मगर यांच्या प्रयत्नांना अखेर यश

# निमगाव-अकलूज, निमगाव-पिलीव एस.टी. बससेवा सुरू



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निमगाव, अकलूज व पिलीव परिसरातील नागरिक, विद्यार्थी, नोकरदार, शेतकरी तसेच सर्वसामान्य प्रवाशांची एस.टी. बससेवा सुरू करण्याची मागणी गेल्या अनेक दिवसांपासून प्रलंबित होती. या मार्गावरील नागरिकांना प्रवासासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता.

नागरिकांची ही अडचण लक्षात घेऊन माळशिरस तालुक्याचे कर्तव्यदक्ष सभापती मा. श्री. दत्ता भैय्या मगर यांनी संबंधित प्रशासन व एस.टी. महामंडळाकडे सातत्याने पाठपुरावा करून ही बससेवा सुरू करण्यासाठी विशेष प्रयत्न केले.

या प्रयत्नांना सकारात्मक प्रतिसाद मिळाला असून निमगाव – अकलूज – निमगाव – पिलीव या मार्गावर एस.टी. बससेवा सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे या परिसरातील नागरिकांची प्रवासाची मोठी गैरसोय दूर होणार असून विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक, शेतकरी, कामगार व नोकरदार वर्गाला याचा मोठा फायदा होणार आहे.

जनतेच्या अडचणी समजून घेऊन त्या सोडवण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे, हाच खऱ्या अर्थाने लोकप्रतिनिधीचा धर्म!

जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य देत विकासकामांसाठी सदैव तत्पर असणारे मा. श्री. दत्ता भैय्या मगर यांच्या प्रयत्नातून आणखी एक महत्त्वपूर्ण सुविधा नागरिकांच्या सेवेत दाखल झाली आहे.

# कळंब येथे एस.टी. पतसंस्थेच्या सचिवपदी उमाकांत गायकवाड यांची बिनविरोध निवड



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ कर्मचारी सहकारी पतसंस्था लि. छत्रपती संभाजीनगरच्या सचिवपदी कळंब आगारातील वाहक उमाकांत गायकवाड यांची बिनविरोध निवड झाली आहे.

स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून कळंब बस आगारात आगार प्रशासनाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. आगारप्रमुख विजयकुमार घोलप यांच्या हस्ते गायकवाड यांचा सत्कार करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

या नंतर कळंब आगारातील संघटनेच्या वतीनेही गायकवाड यांच्या निवडीबद्दल विशेष सत्कार करण्यात आला.

एसटीकर्मचाऱ्यांच्यासहकारी पतसंस्थेच्या सचिवपदाची महत्त्वाची जबाबदारी गायकवाड यांच्यावर सोपवण्यात आल्याने आगारातील कर्मचारी वर्गातून समाधान व्यक्त होत आहे. त्यांच्या अनुभवाचा पतसंस्थेच्या कामकाजाला फायदा होईल असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

या सत्कार प्रसंगी अशोक पाटील, महेश थोरबोले, वाहतूक नियंत्रक चेतन गोसावी, एस. व्ही. सारूक, स्थानक प्रमुख बालाजी मुळे, कार्यशाळा अधीक्षक श्री. कवडे, गणपत जाधव, रामलिंग जाधवर, विलास जाधव, प्रभाकर झांबरे, अनिल बांगर, विश्वनाथ माळी, बळीराम कवडे, शिवाजी बांगर यांच्यासह यांत्रिक विभागातील कर्मचारी, वाहक व चालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिवडीनगरी श्री साई नामाने दुमदुमली

# श्री क्षेत्र शिवडी ते श्री क्षेत्र शिर्डी साई पालखी सोहळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
निफाड/प्रतिनिधी

श्री साई भक्तांच्या श्रद्धेचा आणि भक्तिभावाचा अनोखा सोहळा असलेल्या श्री क्षेत्र शिवडी ते श्री क्षेत्र शिर्डी साई पालखी सोहळ्याचे आयोजन सालाबादप्रमाणे याही वर्षी करण्यात आले. असून या पालखी सोहळ्याचे हे ९ वे वर्ष आहे ,

यावेळी श्री साईंच्या पालखीची मिरवणूक काढण्यात आली. असून शनिवार दि. १५ ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजता पालखीचे शिर्डीकडे प्रस्थान झाले.

या सोहळ्यात विविध ठिकाणी साईभक्तांकडून पालखीचे स्वागत, महाप्रसाद, चहा–नाश्ता तसेच भक्तांसाठी विविध सेवा नियोजन करण्यात आले होते ,पालखी सोहळ्यात , साईनामाचा जयघोष, करत भजन–कीर्तन,आदी धार्मिक कार्यक्रमांचा साईभक्तांनी आनंद घेतला. पालखी सोहळ्याच्या नियोजनासाठी विविध गावांतील साईभक्त, सेवाभावी कार्यकर्ते आणि आयोजकांनी परिश्रम घेतले. 'श्रद्धा आणि सबुरी'चा संदेश देत श्री क्षेत्र शिवडी ते श्री क्षेत्र शिर्डी हा भक्तीचा प्रवासाला मोठ्या उत्साहात प्रारंभ करण्यात आला.




हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या चरणी अर्पण केलेल्या महावस्त्रांचा महासेल

## भाविकांना अल्प दरात महावस्त्रे उपलब्ध



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांच्या वतीने श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या तसेच परिवार देवतांच्या चरणी भक्तिभावाने अर्पण केलेली व परिधान केलेली महावस्त्रे भाविक व नागरिकांना अल्प दरात उपलब्ध करून देण्यासाठी महावस्त्र महासेल आयोजित करण्यात आला आहे.

श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या चरणी भक्तिभावाने अर्पण केलेल्या या महावस्त्रांना धार्मिक व भावनिक महत्त्व आहे. ही महावस्त्रे प्रसादस्वरूपात आपल्या घरी नेण्याची विशेष संधी या महासेलच्या माध्यमातून भाविकांना उपलब्ध झाली आहे.

या महासेलमध्ये साड्या, ब्लाऊज पिस, चोळीखण, उपरणे, शाल, शेला, धोतर, सोहळे, लुंगी, टॉवेल, टोपी, नॅपकीन आदी विविध प्रकारची महावस्त्रे विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

महावस्त्रांच्या किंमती अत्यंत माफक ठेवण्यात आल्या आहेत. उपलब्ध साड्या ₹१०५ ते ₹७,१००, शाल ₹१०५ ते ₹३१५, शेला ₹१०५ ते ₹१,०५०, सोहळे व उपरणे ₹२१० ते ₹३,१००, धोतर ₹२१० ते ₹१,०५० या दरात उपलब्ध आहेत. तसेच ब्लाऊज पिस, टॉवेल, टोपी, नॅपकीन आदी वस्तू ₹१०५ पासून, तर चोळीखण व लुंगी प्रत्येकी ₹२१० दराने उपलब्ध आहेत.

या महासेलमध्ये विविध प्रकारच्या महावस्त्रांचा मोठ्या प्रमाणात साठा उपलब्ध असून, त्याची एकूण किंमत सुमारे ₹२८ लाख इतकी आहे. भाविकांच्या सोयीसाठी महावस्त्राचे प्रकार व दरानुसार वर्गीकरण करण्यात आले आहे.

श्री विठ्ठल, श्री रुक्मिणी माता तसेच परिवार देवतांच्या चरणी भाविकांकडून मोठ्या प्रमाणात महावस्त्रे अर्पण केली जातात. प्राप्त होणाऱ्या महावस्त्रांसाठी मंदिर समितीच्या वतीने स्वतंत्र कक्ष निर्माण करण्यात आला असून, त्याची जबाबदारी सहाय्यक विभाग प्रमुख एकनाथ दर्शने व विभाग प्रमुख भीमाशंकर सारवडकर यांच्याकडे सोपविण्यात आली आहे.

श्रींच्या चरणाजवळ प्राप्त होणारी तसेच भेट स्वरूपात येणारी महावस्त्रे नियमानुसार विगतीकरण, मूल्यांकन व पॅकिंग करून भाविकांना स्टॉलच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात येतात. त्यासाठी श्री संत ज्ञानेश्वर दर्शन मंडप येथे स्वतंत्र स्टॉल उभारण्यात आला आहे. तथापि, अधिक मास व आषाढी यात्रेच्या कालावधीत मोठ्या प्रमाणात महावस्त्रे प्राप्त झाल्याने ती भाविकांना उपलब्ध करून देण्यासाठी विशेष महावस्त्र महासेल आयोजित करण्यात आला आहे. हा महासेल दि. १९ ऑगस्ट ते २४ ऑगस्ट २०२६ या कालावधीत दररोज सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० या वेळेत श्री संत तुकाराम भवन, तिसरा मजला, पंढरपूर येथे आयोजित करण्यात आला आहे.

श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या चरणी अर्पण केलेले महावस्त्र प्रसाद स्वरूपात आपल्या घरी नेण्याची ही विशेष संधी असून, भाविक व नागरिकांनी मोठ्या संख्येने या महासेलचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंदिर समितीचे व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांनी केले आहे.

# वैनतेय विद्यालयात नशामुक्ती शपथ कार्यक्रम संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड प्रतिनिधी : राज्य शासनाच्या 'नशामुक्त महाराष्ट्र अभियान' अंतर्गत वैनतेय विद्यालयात नशामुक्ती शपथ कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी न्या रानडे विद्या प्रसारक मंडळ संस्थेचे कार्यकारी विश्वस्त वि. दा. व्यवहारे, सचिव रतन पाटील वडघुले, प्राचार्या श्रीमती मनीषा गुजराथी, उपप्राचार्या रंजना लाहोटी, पर्यवेक्षक बी.बी.गुंजाळ, पर्यवेक्षक चंद्रकांत जाधव, आदींसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना तंबाखू, गुटखा, तसेच इतर सर्व प्रकारच्या व्यसनांपासून दूर राहण्याचे आवाहन करण्यात आले. स्वतः व्यसनमुक्त राहून कुटुंब, समाज आणि राष्ट्राला व्यसनमुक्त करण्यासाठी जनजागृती करण्याची प्रतिज्ञा सर्वांनी घेतली.

यावेळी कार्यकारी विश्वस्त वि.दा.व्यवहारे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, व्यसनमुक्त तरुणाई ही सुदृढ आणि प्रगत राष्ट्राची खरी ताकद आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने स्वतः व्यसनांपासून दूर राहून इतरांनाही व्यसनमुक्त जीवनाचा संदेश द्यावा.

यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष कांदळकर, सदस्य कराड, पवार निफाडच्या माजी नगराध्यक्षा कांताबाई कर्डिले, सौ.ससाणे, सौ लगडे यासह सर्व शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

# कलेच्या साधनेने माणसाचे व्यक्तिमत्व सकारात्मक होते : प्रा. स्वाती कराड चाटे



**एमआयटी विश्वशांती गुरुकुलमध्ये 'रसतरंगिणी' सांस्कृतिक संध्या उत्साहात संपन्न**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : आजच्या तणावपूर्ण जीवनात कलेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. कलेचे सादरीकरण ही केवळ अभिव्यक्ती नसून एक ध्यानस्थ प्रक्रिया आहे. कलाकार जेव्हा कलेशी एकरूप होतो, तेव्हा त्याचे मन आणि शरीर त्या कलेशी जोडले जाते. कलेच्या अशा साधनेतून व्यक्तिमत्त्व अधिक सकारात्मक होते, असे प्रतिपादन माईर्स एमआयटीच्या विश्वस्त व महासचिव प्रा. स्वाती कराड चाटे यांनी केले. कोथरूड येथील एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूलच्या सभागृहात नृत्यवेध कथक नृत्य संस्थेतर्फे आयोजित 'रसतरंगिणी' या सांस्कृतिक कार्यक्रमात प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. कार्यक्रमाची सुरुवात एमआयटीच्या विश्वशांती प्रार्थनेने झाली. त्यानंतर प्रा. स्वाती कराड चाटे, एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी स्कूल ऑफ फोटोग्राफीच्या संचालिका अश्विनी अभ्यंकर-घैसास आणि नृत्यवेधच्या संचालिका व प्रसिद्ध कथक नृत्यांगना डॉ. माधुरी आपटे यांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले.

पुढे बोलताना प्रा. स्वाती कराड म्हणाल्या विद्यार्थी खऱ्या अर्थाने वर्गाच्या बाहेर घडतो. त्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत 'परफॉर्मिंग आर्टस' स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे.

यासाठी माईर्स एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांनी तंत्रशिक्षणासोबतच विश्वशांती संगीत कला अकादमी, फिल्म इन्स्टिट्यूट, स्कूल ऑफ फोटोग्राफी यांसारख्या संस्थांची उभारणी केली. कथकच्या माध्यमातून डॉ. माधुरी आपटे केवळ नृत्यांगना घडवत नाहीत, तर उत्कृष्ट माणूस घडविण्याची साधना करीत आहेत.

कार्यक्रमामध्ये डॉ. माधुरी आपटे, नृत्यवेध आणि शाळेच्या विद्यार्थिनींनी सादर केलेल्या विविध कथक नृत्यरचनांनी उपस्थित रसिकांना मंत्रमुग्ध केले. सरस्वती वंदना, ताल गजझंपा आणि 'भाग्यदा लक्ष्मी बारम्मा' यांसारख्या पारंपरिक रचनांबरोबरच मोझर्टच्या सिम्फनीवर सादर करण्यात आलेल्या कथक फ्युजनच्या अनोख्या प्रयोगाने कार्यक्रमाला विशेष रंगत आणली.

स्कूल ऑफ फोटोग्राफीच्या संचालिका अश्विनी अभ्यंकर-घैसास यांनी विद्यार्थिनींनी सादर केलेल्या कलेचे कौतुक करताना म्हणाल्या डॉ. माधुरी आपटे यांनी कथकचे सादरीकरण आणि कलेचा अभ्यास याची उत्कृष्ट सांगड घालत विशेष प्राविण्य मिळविले आहे. गुरू पंडिता मनीषा साठे यांच्याकडून प्राप्त कलेचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्या करीत आहेत.

डॉ. माधुरी आपटे म्हणाल्या एमआयटी विश्वशांती गुरुकुल आणि नृत्यवेध यांच्यातील सहकार्याला दोन वर्षे पूर्ण झाली असून भारतीय कला आणि संस्कृती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावी तसेच कलेच्या माध्यमातून त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, या उद्देशाने शाळेत कथकचे वर्ग सुरू करण्यात आले आहेत. या कार्यक्रमाला विश्वशांती गुरुकुल स्कूल व ज्यु. कॉलेजचे प्राचार्य जितेंद्र खैरनार, व्हीजीएस ग्रुपच्या प्रकल्प संचालिका डॉ. ज्योती ज्योतवानी, शैक्षणिक प्रमुख शीतल वर्मा, श्री संत ज्ञानेश्वर विद्यालयाचे मुख्याध्यापक नागनाथ सानप, प्राथमिकच्या मुख्याध्यापिका नीलम वाघ, नृत्यवेध संस्थेच्या विद्यार्थिनी, शाळेचे शिक्षक, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन स्वानंद पटवर्धन यांनी केले.

# वाखरी येथील एमआयटी विश्वशांती गुरुकुलमध्ये स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा



**'विविधतेत एकता' आणि 'विकसित भारत'चा संदेश देत विद्यार्थ्यांनी केला देशभक्तीचा जागर**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : वाखरी, पंढरपूर येथील एमआयटी विश्वशांती गुरुकुलमध्ये भारताचा ८० वा स्वातंत्र्यदिन देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. २०४७ मध्ये 'विकसित भारत'चे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून भारताची विविध क्षेत्रांतील प्रगती, सांस्कृतिक वैविध्य आणि विविधतेतील एकतेचे दर्शन घडविणारा स्वातंत्र्यदिनाचा हा सोहळा उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुणे डॉ. सुदेश दोशी यांच्या हस्ते ध्वजारोहण करून करण्यात आली. याप्रसंगी एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूलचे मुख्याध्यापक शिवाजी गवळी, ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य स्वप्निल शेठ आणि एमआयटी वाखरी संकुलाचे सहयोगी संचालक कर्नल डी. के. उपाध्याय उपस्थित होते.

स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे प्रभावी सादरीकरण करताना भारताच्या सांस्कृतिक वैविध्यात दडलेली एकात्मता प्रभावीपणे मांडली. यावेळी विद्यार्थ्यांनी कराटे प्रात्यक्षिक व योगासने सादर केली. देशाच्या संस्कृतीचे दर्शन घडविणारे नृत्याविष्कार, काव्यरचना आणि देशभक्तिपर समूहगीतांनी कार्यक्रमाला विशेष रंगत आली.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे डॉ. सुदेश दोशी यांनी आपले विचार व्यक्त करताना सांगितले की विकसित भारताचे स्वप्न साकार करण्याची ताकद आजच्या युवा पिढीत आहे; गरज आहे ती या युवा पिढीच्या विचारांना योग्य दिशा देण्याची. देशप्रेम हे केवळ घोषणांमध्ये न राहता आपल्या कृतीतून दिसले पाहिजे.

शाळेचे मुख्याध्यापक शिवाजी गवळी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, देशसेवा करण्यासाठी नेहमीच मोठे कार्य करावे लागते असे नाही. दैनंदिन जीवनातील आपली कर्तव्ये प्रामाणिकपणे पार पाडणे हीदेखील देशसेवाच आहे.

आजचे विद्यार्थी भविष्यातील विकसित भारताचे शिल्पकार असून, ज्ञानासोबतच संस्कार, शिस्त, राष्ट्रनिष्ठा आणि जबाबदार नागरिकत्वाची भावना आत्मसात करण्याचे आवाहन ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य स्वप्निल शेठ यांनी याप्रसंगी बोलताना केले. देशभक्तीचा संदेश आणि विकसित भारताच्या संकल्पनेची प्रेरणा घेऊन विद्यार्थ्यांनी देशाच्या प्रगतीत आपले योगदान देण्याचा संकल्प यावेळी केला.

# ग्रामीण भागातील गुणवत्तेचा डंका! सुपतगावच्या श्रीयश गुरवची 'नासा' अभ्यासदौऱ्यासाठी निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



धाराशिव/प्रतिनिधी : जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमांच्या जोरावर ग्रामीण भागातील विद्यार्थीही जगाच्या पाठीवर आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवू शकतात, हे उमरगा तालुक्यातील सुपतगाव येथील गुणवंत विद्यार्थ्याने सिद्ध करून दाखवले आहे. जिल्हा परिषद शाळा, सुपतगाव येथील अत्यंत हुशार विद्यार्थी चि. श्रीयश ज्ञानेश्वर गुरव याने जिल्हास्तरीय परीक्षेत तालुक्यातून प्रथम (१ ला) क्रमांक मिळवून अभूतपूर्व यश संपादन केले आहे. त्याच्या या उज्ज्वल यशाच्या जोरावर त्याची अमेरिकेतील जगातील अव्वल अंतराळ संशोधन संस्था 'नासा' (छड) येथील विशेष अभ्यासदौऱ्यासाठी निवड झाली आहे.

**जिल्हास्तरीय परीक्षेत प्रथम क्रमांक; १५ ऑगस्ट रोजी पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष सत्कार**

स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून आज, १५ ऑगस्ट रोजी धाराशिव जिल्हाधिकारी कार्यालय येथे आयोजित विशेष सत्कार समारंभात धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या शुभहस्ते श्रीयशचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी खासदार ओमराजे निंबाळकर, जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, पोलीस अधीक्षक रितू खोकर, जि.प अध्यक्ष अर्चनाताई पाटील, उपाध्यक्ष उषाताई गायकवाड, श्रीयशचे मार्गदर्शक शिक्षक चिदानंद स्वामी आणि पालक पत्रकार ज्ञानेश्वर गुरव यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यशाची ठळक वैशिष्ट्ये :

गुणवंत विद्यार्थी चि. श्रीयश ज्ञानेश्वर गुरव हा जिल्हा परिषद शाळा, सुपतगाव (ता. उमरगा) जिल्हास्तरीय परीक्षेत संपूर्ण जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवित अमेरिका येथील 'नासा' (छड) अंतराळ संशोधन केंद्र अभ्यासदौरा सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेऊन 'नासा'सारख्या जागतिक दर्जाच्या अंतराळ संशोधन संस्थेच्या अभ्यासदौऱ्यासाठी निवड झाल्याबद्दल श्रीयशचे सर्वत्र कौतुक होत आहे.

या दैदिप्यमान यशाबद्दल श्रीयशसह त्याला मार्गदर्शन करणारे शिक्षक, मुख्याध्यापक आणि त्याच्या पालकांवर संपूर्ण उमरगा तालुक्यातून व धाराशिव जिल्ह्यातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. श्रीयशच्या या यशामुळे सुपतगावच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, त्याचा हा गौरव ग्रामीण भागातील इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

**पहाटेच्या सुमारास तीन चोरट्यांचा धुमाकूळ; चाकूचा धाक दाखवत ३१ हजार १५० रुपयांचा ऐवज लंपास**

# निफाडमध्ये कॉन्फिडन्स एलपीजी गॅस पंपावर धाडसी चोरी!




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड शहरालगत रसलपूर फाटा येथील कॉन्फिडन्स एलपीजी गॅस पंपावर पहाटेच्या सुमारास तीन अनोळखी चोरट्यांनी धाडसी चोरी केल्याची घटना समोर आली आहे. चोरट्यांनी गॅस पंपाच्या केबिनमध्ये प्रवेश करून सेल्समनला चाकूचा धाक दाखवत मारहाण केली आणि रोख रकमेसह मोबाईल असा एकूण ३१ हजार १५० रुपयांचा ऐवज लंपास केला.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी विलास भास्कर मोगल (वय ५०, व्यवसाय-सेल्समन) हे कॉन्फिडन्स एलपीजी गॅस पंप, रसलपूर फाटा, निफाड येथे गेल्या सुमारे दहा वर्षांपासून सेल्समन म्हणून काम करीत आहेत.

१७ ऑगस्ट २०२६ रोजी पहाटे सुमारे ४.३० वाजता तीन अनोळखी इसमांनी गॅस पंपाच्या केबिनजवळ येऊन काचेचा दरवाजा लोखंडी टामीच्या सहाय्याने फोडला आणि केबिनमध्ये प्रवेश केला. त्यावेळी तिघांनीही चेहऱ्यावर मास्क बांधलेला होता.

या तिघांपैकी एका इसमाने फिर्यादीला आवाज देऊन तुमच्याकडे सीएनजी गॅस आहे का? अशी विचारणा केली. त्यावेळी फिर्यादीने सीएनजी गॅस नसून एलपीजी गॅस असल्याचे सांगितले. त्यानंतर चोरट्यांनी अचानक फिर्यादीवर हल्ला करत चाकूचा धाक दाखवला.

चोरट्यांनी फिर्यादीच्या खिशातील रोख रक्कम जबरदस्तीने काढून घेतली. तसेच केबिनमधील ड्रॉवरमध्ये ठेवलेली रोख रक्कमही चोरून नेली. याशिवाय सुमारे ५ हजार रुपये किमतीचा सॅमसंग कंपनीचा अँड्रॉइड मोबाईल देखील चोरट्यांनी हिसकावून घेतला.

या चोरीमध्ये २६ हजार १५० रुपये रोख रक्कम आणि ५ हजार रुपये किमतीचा मोबाईल, असा एकूण ३१ हजार १५० रुपयांचा मुद्देमाल चोरीस गेल्याचे पोलिस तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

घटनेनंतर तिन्ही चोरटे मोटारसायकलवरून अंधाराचा फायदा घेत पसार झाले. या घटनेमुळे रसलपूर फाटा परिसरात खळबळ उडाली असून, पहाटेच्या वेळी गॅस पंपासारख्या ठिकाणी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे.


या प्रकरणी निफाड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी तपास सुरू केला आहे. पोलिस निरीक्षक अभिजित सोनवणे यांचे मार्गदर्शनाखाली सा.पो. निरीक्षक सोनल फडोळ ,पोलीस अरविंद ढवळे, धनंजय जाधव, नितीन सांगळे ,विनोद जाधव. पुढील घटनेचा शोध घेत आहे.


**सुरक्षिततेसाठी केवळ पोलिसांवर अवलंबून न राहता प्रत्येक नागरिकांनी सतर्क राहाने गरजेचे आहे, व्यावसायिक आस्थापनांनी सीसीटीव्ही कॅमेरे कार्यरत ठेवावे व त्यांचे फुटेज नियमित तपासावे , तसेच सायरन ची व्यवस्था करावी व कठीण प्रसंगी सायरन वाजून आजूबाजूच्या लोकांनाही सावध करावे,रोख रक्कम दुकानात किंवा कार्यालयात मोठ्या प्रमाणात ठेवू नये, संशयास्पद व्यक्ती, वाहन, किंवा हालचाल आढळल्यास स्वतःहून प्रतिकार करण्याऐवजी पोलिसांना तात्काळ माहिती द्यावी, आपत्कालीन परिस्थितीत पोलिसांशी त्वरित संपर्क साधावा आणि घटनास्थळावरील महत्त्वाची पुरावे जतन करावे**

**– पोलिस निरीक्षक**
**अभिजीत सोनवणे**
**निफाड पोलीस ठाणे**

# अक्कलकोटकर रत्नांचा पुण्यात होणार सन्मान सोहळा

## विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा 'अक्कलकोट भूषण व अक्कलकोट रत्न' पुरस्काराने गौरव






**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : अक्कलकोट तालुक्याचे नाव विविध क्षेत्रांत उज्ज्वल करणाऱ्या आणि पुणे शहरात आपल्या कार्याचा ठसा उमटविणाऱ्या अक्कलकोटकरांचा सन्मान करण्यासाठी गावगाथा मीडिया नेटवर्कच्या वतीने 'अक्कलकोट रत्न पुरस्कार सोहळा-२०२६' आयोजित करण्यात आला आहे. हा सन्मान सोहळा शनिवार, दि. २२ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ५ ते ८ या वेळेत स्वारगेट येथील नितू मांडके सभागृहात होणार आहे.

या सोहळ्यास अक्कलकोटचे आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी, पुणे उपमहापौर परशुराम वाडेकर तसेच निवृत्त आयएएस अधिकारी शेखर गायकवाड ,अमितेश कुमारपोलीस आयुक्त पुणे,यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.या वेळी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा गौरव करण्यात येणार आहे. अक्कलकोट भूषण पुरस्काराने श्रीमंत जन्मेजयराजे भोसले महाराज (अध्यक्ष, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ, अक्कलकोट), मल्लिनाथ कल्लशेट्टी (माजी जिल्हाधिकारी), माधव राजगुरू (ज्येष्ठ साहित्यिक) आणि शरणकुमार निंबाळे (ज्येष्ठ साहित्यिक) यांचा सन्मान करण्यात येणार आहे.

तसेच पौर्णिमाताई गायकवाड (आयपीएस), बंडोपंत कुलकर्णी (जिल्हा न्यायाधीश, पुणे), महेश बोळकोटगी (पोलीस निरीक्षक), रविकांत पाटील (सहकार व साखर उद्योग क्षेत्र), गणेश फुलारी (उद्योजक), वीरभद्र हारकूड (अध्यक्ष, पुणे अक्कलकोट रहिवासी मंच), संजीवकुमार हिळ्ळी (सिने छायाचित्रकार), चंद्रशेखर भांगे (पत्रकार, लोकशाही न्यूज), सिद्धार्थ कापसे (युवा उद्योजक), डॉ. अमोगसिद्ध शिवाजी चेंडके (मराठी भाषा व संतसाहित्य अभ्यासक) आणि ड. सदाशिव माळगे यांना 'अक्कलकोट रत्न' पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

पुणे शहरात शिक्षण, नोकरी, व्यवसाय, उद्योग, प्रशासन, साहित्य, सामाजिक कार्य, कला, पत्रकारिता आणि अन्य विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या अक्कलकोटकरांना एकत्र आणणे आणि त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांचा गौरव करणे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. आपल्या मूळ गावाशी नाळ जोडून ठेवत पुणे शहरात विविध क्षेत्रांत कार्य करणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन देण्याचा हा प्रयत्न असल्याचे आयोजकांनी सांगितले.

अक्कलकोट तालुक्याचे सामाजिक, सांस्कृतिक आणि वैचारिक वैभव पुणे शहरात अधिक दृढ व्हावे, तसेच विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या अक्कलकोटकरांमध्ये परस्पर संवाद, सहकार्य आणि आपलेपणाची भावना वाढीस लागावी, या उद्देशाने या सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

पुण्यातील अक्कलकोटकरांच्या कर्तृत्वाचा गौरव करणारा हा सोहळा अक्कलकोटकरांसाठी एकत्र येण्याची आणि आपल्या माणसांच्या कार्याची दखल घेण्याची संधी ठरणार आहे. पुणे शहर व परिसरातील अक्कलकोटकरांनी या सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन गावगाथा मीडिया नेटवर्कचे मुख्य संपादक धोंडप्पा नंदे तसेच पुरस्कार सोहळा समितीचे सदस्य ड. सदाशिव माळगे, स्वामी चौगुले, अंबादास गवंडी, संतोष राठोड, सोमेश्वर वाडी, डॉ. अमोगसिद्ध चेंडके, कल्याणराव मंठाळे आणि राहुल भंडारी यांनी केले आहे.

# काकासाहेबनगर शैक्षणिक संकुलात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : के के वाघ शैक्षणिक संकुल काकासाहेब नगर रानवड येथे ८० वा स्वातंत्र्य दिन, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी व पालक यांच्या उपस्थितीत आनंदात साजरा करण्यात आला.असुन प्रमुख अतिथी धनंजय होळकर यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

त्यांनी आपल्या मनोगतातून आपल्या राष्ट्राचे काहीतरी देणे लागतो. त्याअनुषंगाने आपण राष्ट्रहित जपत देशाच्या विकासासाठी प्रयत्नशील राहण्याचे आवाहन केले.

इंग्लिश स्कुलच्या विद्यार्थ्यांनी मनोगते व्यक्त करत स्वातंत्र्यासाठी बलिदान दिलेल्या वीरांना श्रद्धांजली वाहिली. तसेच कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य शरद कदम यांनी स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा देत भारतीय स्वातंत्र्य दिन चिरायू करण्याची जबाबदारी ही पुढील पिढीची असल्याचे नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मिलिंद पवार यांनी केले तर प्रा. गणेश आवारे यांनी उपस्थितांचे आभार मानले. यावेळी रानवड पंचक्रोशीतील प्रतिष्ठित नागरिक, रामनाथ पानगव्हाणे, रघुनाथ कोल्हे, कचूनाना शिंदे, वैभव कुशारे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ अतुल गवारे, इंग्लिश मिडीयम स्कुलचे प्राचार्य शरद कदम तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक व विविध पदाधिकारी उपस्थित होते.

# विक्रोळीत रंगणार भव्य 'दहीहंडी सराव शिबीर २०२६'; लालबत्ती मित्र मंडळ आणि ईशान्य मुंबई जिल्हा भाजपा तर्फे आयोजन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/केतन भोज ; गोपाळकाळ्याचा उत्साह आणि गोविंदा पथकांची पूर्वतयारी लक्षात घेता,ईशान्य मुंबई जिल्हा भारतीय जनता पार्टी आणि लालबत्ती मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य दहीहंडी सराव शिबीर २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे.भारतीय जनता पार्टी ईशान्य मुंबई जिल्ह्याचे उपाध्यक्ष श्री.अनिल भाई निर्मळे यांच्या पुढाकाराने व सहकार्याने या सराव शिबिराचे आयोजन करण्यात आले असून गोविंदा पथकांना प्रोत्साहन देणे हा यामागील मुख्य उद्देश आहे.

हा दहीहंडी सराव शिबीर दिनांक ३० ऑगस्ट २०२६ रोजी विक्रोळी पार्क साईट येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर पार पडणार आहे.या दहीहंडी सराव शिबीरामध्ये सहभागी होणाऱ्या गोविंदा पथकांसाठी मोठ्या प्रमाणात रोख पारितोषिके ठेवण्यात आली आहेत.यामध्ये महिलांच्या सहा थरांच्या दहीहंडीसाठी ११,१११ रुपये आणि नव थरांच्या सलामीसाठी ५५,५५५ रुपयांचे भव्य व आकर्षक बक्षीस जाहीर करण्यात आले आहे.आयोजकांनी या कार्यक्रमात महिला गोविंदा पथकांना प्रथम प्राधान्य दिले असून सहभागी सर्व महिला पथकांना मानधन आणि आकर्षक सन्मानचिन्ह देऊन गौरवले जाणार आहे. उत्सव गोविंदाचा,सुरक्षित आधार सरकारचा हा संदेश देत गोविंदांच्या सुरक्षेलाही विशेष महत्त्व देण्यात आले आहे.तरी सर्व गोविंदा पथकांनी वेळेवर हजर राहून या शिबीराचा लाभ घ्यावा,असे आवाहन लालबत्ती मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.अधिक माहिती व नोंदणीसाठी शिवम मिश्रा (८८९८८७९३१२),महेश कोकणे (८३५५९७१५९९), संकेत पाटणकर (७७३८४७०८७७),हेमंत चांदोलकर(७७१०८१०५९५)व तेजस कामत (८०९७८८८६९५) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# 'RBI आपल्या दारी' - पंढरपूर अर्बन बँक येथे रिझर्व्ह बँकेचे वतीने प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : महाराष्ट्र अर्बन को-ऑप बँक फेडरेशन व पंढरपूर अर्बन बँक यांच्या संयुक्त विद्यमाने रिझर्व बँक ऑफ इंडिया यांचे अधिकारी वर्गामार्फत 'RBI आपल्या दारी' हा एकदिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम गुरुवारी पंढरपूर अर्बन बँकेच्या 'कर्मयोगी सभागृह' येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

मान्यवरांचे हस्ते पांडुरंगाच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी बँकेचे चेअरमन श्री.सतीश मुळे यांचे वतीने मानवरांचा सत्कार करणेत आला.

या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी कॉलेज ऑफ ॲग्रीकल्चर बँकिंग (CB), रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे जनरल मॅनेजर श्री.हरिप्रसाद पटनाईक तसेच श्री.संतोषजी पांडे यांनी रिझर्व बँक तपासणी व गुंतवणूक बाबत धोरणात्मक बाबी बाबत मार्गदर्शन केले. सर्वसामान्यांची आर्थिक नाळ असणाऱ्या सहकारी बँकांना




'RBI आपल्या दारी' - हा बँकिंग क्षेत्रासाठी मार्गदर्शक उपक्रम राबवित अधिक सक्षम बनविण्यासाठी प्रयत्न करीत आहे.

यावेळी फेडरेशनचे अध्यक्ष श्री.अजय ब्र्हेचा म्हणाले, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या तज्ज्ञ अधिकाऱ्यांकडून थेट ग्रामीण भागातील पंढरपूर अर्बन बँक येथे येऊन नागरी सहकारी बँकांसाठी अत्यंत महत्त्वाची व आनंदाची बाब असल्याचे नमूद केले. या प्रशिक्षण कार्यक्रमास नगर, सोलापूर, लातूर व धाराशिव आदी जिल्ह्यांमधून विविध नागरी सहकारी बँकांचे १६० हून अधिक पदाधिकारी व संचालक उपस्थित होते.




प्रशिक्षणादरम्यान गुंतवणूक विषयक बाबी, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडून होणारे परीक्षण, निरीक्षणातील त्रुटी तसेच दोष दुरुस्ती अहवाल याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. दैनंदिन बँकिंग कामकाज अधिक सक्षमपणे व नियमानुसार करण्यासाठी या प्रशिक्षणाचा निश्चितच मोठा फायदा होईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

मध्यवर्ती ठिकाणी अशा प्रकारचे प्रशिक्षण कार्यक्रम सातत्याने आयोजित व्हावेत, अशी अपेक्षा व्यक्त करताना महाराष्ट्र अर्बन को-ऑप बँक फेडरेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.प्रसाद पाटील यांनी पंढरपूर अर्बन बँकेने घेतलेल्या पुढाकाराचे विशेष कौतुक व आभार व्यक्त केले.

पंढरपूर अर्बन बँकेचे सीईओ श्री.उमेश विरधे यांनी आपल्या मनोगतात, हे प्रशिक्षण म्हणजे आपल्याला मिळालेली एक महत्त्वपूर्ण संधी आहे. 'ज्योत से ज्योती जलाते चलो' या भावनेतून आपण येथे घेतलेले ज्ञान आपल्या बँकेतील सहकाऱ्यांपर्यंत पोहोचवावे, असे आवाहन केले. यासाठी सोलापूर नागरी बँक असोसिएशनचे पदाधिकारी यांचे विशेष सहकार्य लाभले.

**प्रवाशांची मागणी : अंधारासह घाणीचे साम्राज्य, सरपटणाऱ्या प्राण्यांची भीती**

# बाराभाटी रेल्वेस्थानकाचे पथदिवे सुरू करून कचरा स्वच्छ करा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुन्नाभाई नंदागवळी/बाराभाटी : स्थानिक ठिकाणच्या रेल्वे स्टेशनवर ७-८ महिन्यापासून पथदिवे बंद आहेत. रात्री प्रवास करताना प्रवाशांना मोठी भीती वाटते. कारण घाणीचे व हिरवा कचरा भरगच्च उगवला आहे. म्हणून बाराभाटी रेल्वेस्थानकाचे पथदिवे सुरू करून कचरा स्वच्छ करा. अशी मागणी प्रवासी करीत आहेत.

रेल्वे स्टेशनची परिस्थिती पाहता सर्व ठिकाणी हिरवा कचरा उगवला आहे. तसेच घाण खूप प्रमाणात पसरली आहे. अशावेळी प्रवास करताना नागरिकांना त्रास होतो तसेच भिती मनात दाटलेली आहे. याप्रकाराची तक्रार गोंदिया रेल्वे कार्यालयाला कळवून काहीच झाले नाही. गोंदिया कार्यालयातील अधिकारी जाणूनबुजून लक्ष देत नाही, असेही सांगण्यात आले.

ा रेल्वे स्टेशनवर यापूर्वी अनेक समस्या निर्माण झाल्या परंतू त्या सोडवण्यात आल्या नाही. हा प्रकार रेल्वे विभागाच्या अधिकाऱ्यांना सांगण्यात आले. पाहणी केली पण त्यावर पर्याय काहीच करण्यात आले नाही. हा रेल्वे विभागाचा कमीपणा आहे. बसायला बैठक खुर्च्या ह्या कमी आहेत. थांबायला बाहेर काहीच व्यवस्था नाही.

संपूर्ण रेल्वे स्टेशनवर पथदिवे लावून ते सतत सुरू राहावे. यासाठी रेल्वे विभागाने तातडीने कारवाई करावी अशी मागणी बाराभाटी येरंडी कुंभीटोला बोळदे कवठा डोंगरगाव सुकळी खैरी ब्राम्हणटोला चापटी पिंपळगाव खांबी आदी गावातील प्रवाशांनी केली आहे.

# कोळविहिरे येथे १० वर्षीय मुलीवरील अत्याचार प्रकरणी ६० वर्षीय आरोपीस अटक




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/ डॉ. विनायक गायकवाड : पुरंदर तालुक्यातील कोळविहीरे गावच्या हद्दीत १० वर्षीय अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना मंगळवारी (दि. ११ ऑगस्ट) घडल्याची माहिती जेजुरी पोलिसांनी दिली. या प्रकरणी जेजुरी पोलीस ठाण्यात गुन्हा र. नं. २२७/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता (इछड) मधील कलम ६४(१), ६४(२)(ख), ६४(२) (घ), ६५ (२), ३५१(२), ३५१(३) तसेच बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यातील संबंधित कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी झुंबर सिताराम खोमणे (वय ६०, रा.कोळविहीर, ता. पुरंदर, जि. पुणे) याला पोलिसांनी अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या जेजुरी पोलिसांच्या माहितीनुसार, दि.११ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास कोळविहीर गावच्या हद्दीत ही घटना घडल्याचा आरोप आहे. आरोपीने अल्पवयीन मुलीला घराच्या पाठीमागील शेतातील सीताफळ बागेत नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याची फिर्याद पोलिसांकडे दाखल करण्यात आली आहे. घटनेची माहिती मिळताच जेजुरी पोलिसांनी तत्काळ कारवाई करत संबंधित आरोपीला ताब्यात घेत अटक केली. या प्रकरणाचा तपास सुरू असून घटनेशी संबंधित सर्व बाबींचा तपास पोलीस करीत आहेत. या गुन्ह्याची नोंद दि. ११ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ५.१९ वाजता करण्यात आली. गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही पोलीस हवालदार नांदे यांनी केली असून, पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक राणे करीत आहेत. प्रभारी अधिकारी म्हणून पोलीस निरीक्षक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.